
# लिंग समभाव आणि महिला सक्षमीकरण




मुख्य संपादक
प्राचार्य डॉ. अशोक खैरनार

संपादक
प्रा. कांतीलाल सोनवणे
प्रा. अतिष मेश्राम
डॉ. प्रियंका सुलाखे



ADM
2018-19
Book
ADM

अथर्व पब्लिकेशन्स

# लिंग समभाव आणि महिला सक्षमीकरण

## Gender Equality and Women Empowerment

© सुरक्षित

ISBN : 978-93-87129-94-8
Book No. : 603

**प्रकाशक**
युवराज भटू माळी
**अथर्व पब्लिकेशन्स**
धुळे : १७, देवीदास कॉलनी, वरखेडी रोड, धुळे ४२४००१.
संपर्क : ९४०५२०६२३०
**जळगाव :** तळमजला, ओम हॉस्पिटल, अँग्लो उर्दू हायस्कूलजवळ, ढाके कॉलनी,
जळगाव ४२५००१. संपर्क : ०२५७-२२३९६६६, ९७६४६९४७९७
ई-मेल : atharvapublications@gmail.com
वेबसाईट : www.atharvapublications.com

**प्रथमावृत्ती :** २० ऑक्टोबर २०१८
**अक्षरजुळवणी :** अथर्व पब्लिकेशन्स
**मूल्य :** ६९५/-

**ऑनलाईन पुस्तक खरेदीसाठी www.atharvapublications.com**

*निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे आदर्श कला महाविद्यालय, निजामपूर-जैताणे येथे दि. २० ऑक्टोबर २०१८ रोजी झालेल्या एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रातील निवडक लेख.*

*या पुस्तकात समाविष्ट लेखांचे हक्क ज्या-त्या लेखकांकडे असून त्यांच्या मताशी मुख्य संपादक, संपादक मंडळ, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत*

# निवडक दलित कथेतील स्त्री दर्शन

– प्रा. अरुण डी. मोरे
मराठी विभाग, पंकज कला महाविद्यालय, चोपडा, जि. जळगाव

मराठी साहित्यात १९६० नंतर दलित साहित्याचा प्रवाह ठळकपणे जाणवू लागला. दलित साहित्याची निर्मिती हा दलित संवेदनशिलतेतून झाला आहे. गरीबी, दारिद्र्य, अस्पृश्यता, अन्याय, अत्याचार, शोषण, व्यथा, वेदना इत्यादी सामाजिक बाबींमुळे दलित स्त्रीची पूर्णपणे होरपळ झालेली दिसून येते. या सर्व गोष्टीमुळे झुंजता झुंजता दलित स्त्री अधिकच खंबीर झालेली दिसून येते. यामागे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे अज्ञानी, अशिक्षित असली तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार तिच्या केंद्रस्थानी आहे. भोवतालच्या जंजाळातून बाहेर पडण्यासाठी आपल्या मुलांना शिकविले पाहिजे असे आशादायी दीप तिच्या हृदयात तेवत असलेले दिसून येतात.

निवडक दलित कथाकार तु.लि.कांबळे, रविश्चंद्र हडसनकर, एकनाथ सोनवणे, प्रकाश मोगले, आत्माराम गोडबोले, किशोर घोरपडे यासारख्या १९८० नंतरच्या दलित कथाकारांच्या कथेतील स्त्रिया वेगळ्या विचाराने भारावलेल्या दिसतात. तु.लि.कांबळे यांच्या 'जळ', 'मांजराकाठची माणसे', 'गावठाण', 'देवाची वाडी', 'जिणं वादळाचं', 'स्मारक', 'शोषित माणसे' या कथासंग्रहातील स्त्रिया अतिशय जागृत झालेल्या असून आपले शील, चारित्र्य त्या जपताना दिसतात. 'गुन्हेगार' या कथेत निष्पाप व निराधार स्त्रियांना मारहाण होताना दिसते. 'निंदणी' या कथेत स्त्रियांच्या मुक्तीसाठी आणि उत्थानासाठी फुले, आंबेडकर पुढे आल्यामुळेच दबलेल्या सर्वच वर्गाच्या स्त्रियांना मुक्तीचा मार्ग त्यांनी मोकळा केला आहे. त्यामुळे दलित स्त्रियांकडे वाकड्या नजरेने बघण्याची हिम्मत प्रस्थापितांची होत नाही. कारण त्या स्त्रियांना भाकरीपेक्षा इज्जत प्यारी आहे. आंबेडकरी विचारांचे पाणी दाखविणाऱ्या स्त्रिया समाजात आपल्याला दिसतात. 'झुनका' या कथेत तु.लि.कांबळे यांनी थकलेल्या तरी पोटासाठी काम करणाऱ्या दुःखी जीवन व्यथांचे चित्रण आपल्या कथेत केलेले दिसते. तसेच 'नागाबाई' या कथेत वृद्धावस्थेत राहणाऱ्या स्त्रिचे व्यक्तिचित्र कारुण्याने ओथंबलेले आहे. नागाबाईच्या जीवनात आशेचा किरण म्हणजे निराधार म्हणून सरकारकडून ६० रुपये पगार योजनेचा लाभ तिला मिळतो. त्यावर तिचे सगळे जीवन अवलंबून आहे. एकूणच तु.लि.कांबळे यांच्या सर्वच कथेतील स्त्रीपात्र



Scanned with OKEN Scanner

परिस्थितीशी संघर्ष करीत जीवनाला सामोरे जाताना दिसतात.

रविश्चंद्र हडसनकर यांच्या 'दावण, दरी आणि सरणझळा' या कथासंग्रहातील स्त्री नायिका अस्वस्थ करुन जाणाऱ्या आहेत. 'शाळा' या कथेतील आई बाब्याला (मुलाला) शिकविण्यासाठी पैसे मिळाले म्हणून पाटलाची दुमजली इमारतीची भिंत सारवण्याचे काम करते. परंतू इमारतीची भिंत सारवत असताना पडून तिचा मृत्यू होतो. पण मृत्यूपूर्वी ती बाळाला शिकण्याचा आग्रह धरताना दिसते. 'लिंबोळ्या' या कथेत हडसनकर सावित्री या नायिकेचे वडील घरात आजारी आहेत. खायला काहीच नाही. म्हणून सावित्री लिंबोळ्या वेचायला दत्तारामच्या शेताकडे जाते. तेव्हा दत्ताराम तिच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करतो. तेव्हा मात्र लाकूड उचलून सावित्री त्याच्या डोक्यावर वार करते. आणि रक्ताळलेल्या लिंबोळ्यांकडे ती स्तब्ध पाहताना दिसते. तसेच 'आंजी' या कथेत हडसनकर यांनी आंजीचे व्यक्तिचित्र रेखाटले आहे. आंजी दिसायला सुंदर आहे. पण गरीबीमुळे ती इतरांच्या शेतात कामावर जाते. रंगराव पाटलांच्या शेतात निंदायला गेले असता रंगराव पाटील तिला पकडतो पण आंजी रंगराव पाटलांवर विळ्याने वार करते. 'आमची इज्जत पाचोळा वाटला का?' असे म्हणत हडसनकर यांच्या कथेतील नायिका आपल्या इज्जतीला जपताना वाघिणीचे रुप घेताना दिसते. रविश्चंद्र हडसनकर यांच्या 'दरी' या कथासंग्रहातील 'मृत्यूपूर्व जबानी' या कथेत सिताबाईला हुंड्यासाठी कशा पद्धतीने तिला जाळून मारले जाते, याचे अतिशय हृदयस्पर्शी वर्णन केले आहे. हुंड्यासाठी स्त्रियांची होरपळ, त्याची कैफियत मुखर करण्याचा प्रयत्न या कथेत झाला आहे. हडसनकर यांच्या 'काळीज' या कथेतील हरणाबाई नवऱ्याचे गाऱ्हाणे आयाबायांजवळ सांगताना दिसते. नवऱ्याने कितीही मारले तरी संशयाने बोलू नये. हे तिचे दुःख आहे. 'मास्तर' या हडसनकर यांच्या कथेतील नायिका पंचशिला अतिशय सुंदर आहे. पण बाजीराव देशमुख मास्तरला अडचणीत आणतो. बाजीराव देशमुख मास्तरची पत्नी पंचशिला हिच्याकडून वाईट अभिलाषा बाळगतो. परंतू पंचशिला शीलवान आहे. ती देशमुखांच्या अभिलाषा पायाने उडवताना दिसते. शेवटी तिच्या पतीला नोकरीवरुन काढून टाकण्याची बातमी आलेला पेपर ती उकीरड्यावर फेकताना दिसते.

एकनाथ सोनवणे यांच्या 'खद्रावळ' या कथासंग्रहातील 'काळोख' ही कथा मोठी बोलकी आहे. शेवंताबाई ही नायिका असून ती विधवा आहे. आपल्या मुलींचे नटणे, सजणे तिला अजिबात आवडत नाही. तिला कामासाठी घराबाहेर जावे लागते. एके दिवशी कामावरुन घरी आल्यानंतर तिची मुलगी घरी नसते. तेव्हा शेवंतीला खूप राग येतो आणि मुलगी नंदाची चिंताही वाटते. मुलीचा पाय वाकडा पडला म्हणून तिला खचल्यासारखे होते. लग्नासाठी ती



Scanned with OKEN Scanner

मास्तराच्या पायावर डोके ठेवताना दिसते. तसेच एकनाथ सोनवणे यांच्या 'चिरा' या कथेत परशा डोंबारीची मुलगी पुतळा तरुण आहे. तिचे लग्नाचे वय झाले आहे. पण लग्नाआधी चिरा उतरविण्याची प्रथा आहे. चिरा उतरविणे म्हणजे लग्नाअगोदर त्या मुलीने गावच्या पाटलाने तिला हात लावायचा असतो. परंतू पुतळाला या घाणेरड्या प्रथेविरुद्ध प्रचंड तिला चिड येते पण भावकी ऐकत नाही. नेमक्या त्या काळात गावचा पाटील वारतो. त्याचा पुतळाबरोबर तिचा चिरा उतरविला जातो. मात्र पुतळा या नायिकेला खूप मोठा आंनद होतो.

प्रकाश मोगले यांच्या 'कावस' या कथासंग्रहातील नायिका परिस्थितीवर स्वार झाली आहे. 'कंच्या बाचं नाव सांगू?' या कथेतील नायिका सीता जोगतीण यल्लमा होती. श्रीमंत बरोबर तिचा चिरा उतरवून नंतर तिची रवानगी कुंटणखाण्यात होते. सीता वेश्या व्यवसाय करुन मुलगी सावित्रीला शाळा शिकवू पाहते. पण शाळेत गेल्यावर मास्तर तिला वडीलांचे नाव विचारतो तेव्हा ती सांगते, "कंच्या बाचं नाव सांगू?" तिचे हे उद्गार हृदय आरपार चिरुन टाकते. तसेच प्रकाश मोगले यांच्या 'अंगुलीमाल' या कथेतील नायिका सीता ही सुंदर तरुणी आहे. तिच्या पतीचा आजारात मृत्यू होतो. तेव्हा वडीलोपार्जित चपला जोडे सांधण्याचे काम ती करते. परंतू इतर लोक तिची टिंगल टवाळी करतात तसेच दोन तरूण सीताच्या दुकानापुढे येतात. ते तिला वाईट बोलतात. आईला वाईट बोलल्याचा राग तिचा छोटा मुलगा किसनला येतो आणि तो रापीने तो त्यांचा खुन करतो. प्रस्थापित बुरसटलेल्या संस्कृतीला एकूणच आव्हान केले आहे. तसेच प्रकाश मोगले यांच्या 'ऑपरेशन' या कथेतील नायिका रखमा आजी पारुं या तिच्या मुलीचे लग्न झाले आहे. त्या जगण्यासाठी राबराब राबताना दिसतात.

आत्माराम गोडबोले यांच्या 'संगर' या कथासंग्रहातील स्त्री नायिका या स्वाभिमानी आहेत. त्या प्रथम स्थानी नसल्या तरी नवऱ्याबरोबर स्वाभिमानाने वावरताना दिसतात.

किशोर घोरपडे यांच्या 'धग' आणि 'घुसमटणी' या दोन कथा संग्रहातून स्त्रीच्या व्यथा, वेदना चित्रीत झाल्या आहेत. 'हुंदका' या कथेत कल्पना अतिशय चांगली कलावंत आहे. पण आमदार तिच्या कलागुणांचे कौतुक करण्यापेक्षा तिच्या दुर्बलतेचा फायदा घेवून साकी म्हणून उपभोगण्याचा प्रयत्न करताना दिसतो. घोरपडे यांच्या 'अनामिका' या कथेत एका निराधार स्त्रीच्या जीवनात अनपेक्षित झालेल्या पापाची भोग मुलीला भोगावे लागतात. कथेची नायिका जानकी मुलगी राधाच्या लग्नाविषयी चिंतीत दिसते. राधा ही बी.एस्सी. झाली आहे. घोरपडे यांच्या 'बळी' या कथेत कावेरी श्रीकांतवर प्रेम करताना दिसते.



Scanned with OKEN Scanner

त्याला आपला स्वतःचा डबा खावू घालते. परंतू श्रीकांत तिच्या प्रेमाला नकार देताना दिसतो. 'एकाकी' ही किशोर घोरपडे यांची अतिशय अस्वस्थ करणारी उलका या नायिकेची शोकांतिका चित्रीत केलेली आहे. प्रकाश आणि उलका यांचे प्रेमात रुपांतर होते. पण त्यांचे प्रेम टिकत नाही कारण प्रकाश टी.बी.चा आजार होवून मरतो आणि उलका पुन्हा एकाकी होते. तसेच घोरपडे यांची 'थॅक्यू डॉक्टर' या कथेत स्वच्छ मनामुळे आवडणारी म्हणून लग्न न ठरणारी प्रौढ कुमारीका चित्रीत झाली आहे. लग्नाचे वय उलटल्यामुळे तिला आपले जीवन निरर्थक व कंटाळवाणे वाटायला लागते. समाजाच्या विरोधात बंड पुकारणाऱ्या मालती या नायिकेची कथा घोरपडे यांनी चित्रीत केलेली आहे. तसेच 'पोलन' या किशोर घोरपडे यांच्या कथेत नायिका गिरजावर अतिप्रसंग ओढवतो. दलित स्त्रीवर पोटासाठी कशी लाचारी येते याचे चित्रण आहे.

युगपुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारीक क्रांतीतून समाज परिवर्तन करणारे हे कथा साहित्य अतिशय प्रेरणादायी आहे. या कथाकारांच्या लेखनाचा परामर्श घेतल्यावर हे स्पष्ट होते की, या कथेतील स्त्री प्रतिमा दुःख, दास्य, अन्याय, अत्याचार, दुबळेपण, दलितत्व, रुढी, परंपरा यातून मुक्त होवून परिवर्तनाची जाणिव होते. एकूणच सर्वच दलित कथाकार यांनी सामाजिक स्त्री जाणिव अतिशय संवेदनशिल पातळीवर व्यक्त करताना दिसतात.

### संदर्भसूची


१. तु.लि. कांबळे, 'जळ', 'मांजराकाठची माणसे', 'गावठाण', 'जिणं वादळाचं', 'शोषित माणसे'.
२. रविचंन्द्र हडसनकर, 'दावण', 'दरी', 'सरणझळा'.
३. एकनाथ सोनवणे, 'खद्रावळ', 'भंगलेल्या दिशा'.
४. प्रकाश मोगले, 'कावस'.
५. आत्माराम गोडबोले, 'संगर'.
६. किशोर घोरपडे, 'धग', 'घुसमटणी'.
७. प्रा.डॉ.के.के. अहिरे, 'साहित्य चर्चा आणि चिंतन'.




Scanned with OKEN Scanner